Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# बीड जिल्ह्यातील लोकसंख्यावाढीचा अभ्यास (जनगणना १९९१ ते २०११)

**डॉ. टेकाडे एम.एस.**
भूगोल विभाग
आनंदराव धोंडे महाविद्यालय,
कडा, ता.आष्टी, जि.बीड

**प्रस्तावना:**

गुणवत्तापूर्ण लोकसंख्या ही राष्ट्रीय संपत्ती असते. मानव स्वत: एक संपदा असून तो भुपृष्ठावरील सर्वात जास्त शक्तीमान अभिकर्ता घटक आहे. कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासाची प्रक्रिया लोकसंख्याची गुणवत्ता व संख्यांत्मक या दोन घटकावर अवलंबून असते. मानव आपल्या बुध्दीमत्तेच्या जोरावर सर्वांगिण विकास घडवून आणतो. मानवाच्या क्रिया प्रकियामुळे उत्पादन प्रक्रियेत बदल होतात म्हणून लोकसंख्या या घटकाचा परिणाम भौतिक, सामाजिक व आर्थिक वातावरणात बदल घडविण्यासाठी कारणीभूत ठरतो. इतर घटकांबरोबरच लोकसंख्येमुळे कृषि विकास हा निर्धारीत होत असतो.

**लोकसंख्यावाढ:**

लोकसंख्या वाढ ही प्रदेशाच्या आर्थिक विकासाचा स्तर दर्शवित असते. लोकसंख्या वाढ आणि साक्षरता ही कृषक समाजातील कृषीतील बदल घडविणारे साधने आहेत. लोकसंख्या वाढीचा कल हा एकूण लोकसंख्येतील वाढ दर्शवितो. कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्या वाढ ही जन्म मृत्यू व स्थलांतर यातील घटकामुळे प्रभावित होते. 'मानवी जन्मदर व मृत्यूदरातील फरकाला नैसर्गिक लोकसंख्या वाढ' असे म्हणतात. लोकसंख्या शेती यामध्ये जवळचा संबंध आहे लोकसंख्यावाढ, लोकसंख्येची घनता, लिंग गुणोत्तर आणि साक्षरता हे लोकसंख्याचे घटक, प्रदेशाच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासामध्ये महत्वाचे आहेत.

**अभ्यासक्षेत्र (बीड जिल्हा):**

बीड जिल्हा मराठवाड्याच्या मध्यस्थानी आहे. बीड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°२७' उत्तर ते १९°२७' उत्तर अक्षांश व रेखावृत्तीय विस्तार ७४°४९' पूर्व ते ७६°४४' पूर्व रेखांश असा आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस औरंगाबाद व जालना, पूर्वेस परभणी व लातून हे जिल्हे आहेत. दक्षिणेस उस्मानाबाद व अहमदनगर तर पश्चिमेस अहमदनगर जिल्हा आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०६९४ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३.४७% एवढे आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५,८५,०४९ होती. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण २.३०% आहे. जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने जिल्ह्याचे दोन महसुली विभाग पाडण्यात आले आहे. एक उपविभाग बीड येथे असून याअंतर्गत बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी, शिरुर (कासार) हे तालुके येतात. दुसरा उपविभाग अंबाजोगाई येथे असून त्याखाली अंबाजोगाई, केज, माजलगांव, धारुर, परळी, वडवणी हे तालुके येतात. जनगणना २०११ नुसार जिल्ह्यात एकूण १३६८ गांवे आहेत.

**बीड जिल्ह्यातील लोकसंख्यावाढ:**


तक्ता १ मधील लोकसंख्येतील एकुण, ग्रामीण व नागरी प्रमाणे दशवार्षिक फरकाचा तपशील दर्शविण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील लोकसंख्यावाढीच्या तपशीलाचा विचार करता असे दिसते की, जिल्ह्याची लोकसंख्या ही १९०१ मध्ये ४८११४० इतकी होती ती वाढून २०११ मध्ये २५८५०४९ इतकी झाली आहे. म्हणजेच गेल्या दहा दशकात लोकसंख्येत १८ पटीने वाढ झाली आहे.

तक्ता क्र. १

**बीड जिल्ह्यातील लोकसंख्येचा दशवार्षिक तपशील (सन १९०१ ते २०११)**

| दशक | एकुण लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या | नागरी लोकसंख्या | लोकसंख्येतील बदल (%) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण | ग्रामीण | नागरी |
| १९०१ | ४८१,१४० | ४३७,८५४ | ४३,२८६ | -- | -- | -- |
| १९११ | ६०६,१०४ | ५६५,९०३ | ४०,२०१ | २५.९७ | २९.२४ | -७.१३ |
| १९२१ | ४५३,८४४ | ४१७,८७५ | ३५,९६९ | -२५.१२ | -२६.१६ | -१०.५३ |
| १९३१ | ६१६,६७५ | ५५८,९२४ | ५७,७५१ | ३५.८८ | ३३.७५ | ६०.५६ |
| १९४१ | ६९१,९४६ | ६२०,२८३ | ७१,६६३ | १२.२१ | १०.९८ | २४.०९ |
| १९५१ | ७८४,९२० | ६९८,४१४ | ८६,५०६ | १३.४४ | १२.६० | २०.७१ |
| १९६१ | ९४९,६७३ | ८५१,०२४ | ९८,६४९ | २०.९९ | २१.८५ | १४.०४ |
| १९७१ | १,२२३,६९४ | १,०७४,३९३ | १४९,३०१ | २८.८५ | २६.२५ | ५१.३५ |
| १९८१ | १,४१२,९९० | १,१८३,२१९ | २२९,७७१ | १५.४७ | १०.१३ | ५३.९० |
| १९९१ | १,८२२,०७२ | १,४९५,१०४ | ३२६,९६८ | २८.९५ | २६.३६ | ४२.३० |
| २००१ | २,१६१,२५० | १,७७४,१८० | ३८७,०७० | १८.६१ | १८.६७ | १८.३८ |
| २०११ | २५८५०४९ | २०७०७५१ | ५१४२९८ | १९.६१ | १६.७२ | ३२.८७ |

स्त्रोत: बीड जिल्हा जनगणना २०११


बीड जिल्ह्यातील लोकसंख्येचा दशवार्षिक तपशील (सन १९०१ ते २०११)
लोकसंख्या
वर्ष
एकूण
ग्रामीण
नागरी
०
५०००००
१००००००
१५०००००
२००००००
२५०००००
३००००००

बीड जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्या ही ४३७८५४ इतकी होती ती आता २०११ च्या जनगणनेनुसार २०७०७५१ इतकी झाली आहे. म्हणजेच यात २१ पटीने वाढ झाली आहे तर बीड जिल्ह्याची नागरी लोकसंख्या ही १९०१ ही ४३२८६ इतकी होती ज्यामध्ये २०११ पर्यंत ५१४२९८ इथपर्यंत पोहोचली आहे. म्हणजेच यात ८ पटीने वाढ झाली आहे. यावरुन असे दिसते की, ग्रामीण लोकसंख्या ही सर्वात जास्त पटीने वाढली आहे.

बीड जिल्ह्यातील एकुण लोकसंख्येचा दशकनिहाय विचार करता असे दिसते की, सर्वात जास्त लोकसंख्या वाढ ही १९३१ मध्ये दिसून येते जी ३५.८८% इतकी आहे तर सर्वात कमी लोकसंख्या वाढ ही १९४१ मध्ये दिसून येते जी १२.२१% इतकी आहे. विविध दशकांपैकी २०% जास्त लोकसंख्या वाढ ही १९९१, १९७१, १९११, १९६१ या दशकांमध्ये दिसून येते तर २०% पेक्षा कमी लोकसंख्या वाढ ही २०११, २००१, १९८१, १९५१ व १९४१ या दशकांमध्ये दिसून येते. एकुण लोकसंख्येमध्ये १९२१ मध्ये लोकसंख्येत ऋणात्मक बदल दिसून येतो जो -२५.१२% इतका आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या वाढीबाबत असे दिसून येते की, सर्वात जास्त लोकसंख्या वाढ ही १९३१ मध्ये दिसून येते जी ३३.७५% इतकी आहे तर सर्वात कमी लोकसंख्या वाढ ही १९८१ मध्ये दिसून येते जी १०.१३% इतकी आहे. विविध दशकांपैकी २०% जास्त लोकसंख्या वाढ ही १९३१, १९११, १९९१, १९६१ व १९६१ या दशकांमध्ये दिसून येते तर २०% पेक्षा कमी लोकसंख्या वाढ ही २०११, २००१, १९८१, १९५१ व १९४१ या दशकांमध्ये दिसून येते. एकुण लोकसंख्येमध्ये १९२१ मध्ये लोकसंख्येत ऋणात्मक बदल दिसून येतो जो -२६.१६% इतका आहे.

बीड जिल्ह्यातील नागरी लोकसंख्या असे दर्शविते की, सर्वात जास्त लोकसंख्या वाढ ही १९३१ मध्ये दिसून येते जी ६०.५६% इतकी आहे तर सर्वात कमी लोकसंख्या वाढ ही १९६१ मध्ये दिसून येते जी १४.०४% इतकी आहे. विविध दशकांपैकी ५०% जास्त लोकसंख्या वाढ ही १९७१, १९८१, १९३१ या दशकांमध्ये दिसून येते तर ५०% पेक्षा कमी लोकसंख्या वाढ ही २०११, २००१, १९९१, १९५१ व १९४१ या दशकांमध्ये दिसून येते. एकुण लोकसंख्येमध्ये

सन १९२१ व १९११ मध्ये लोकसंख्येत ऋणात्मक बदल दिसून येतो जो -१०.५३ व -७.१३ % इतका आहे.

**संदर्भः**


- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा बीड, २००१ ते २०१५
- सिंह, जगदिश (२००४): संसाधन भूगोल, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली.
- मिश्र, पी. एल. (२०१३): प्रयोगात्मक भूगोल, विश्वभारती प्रकाशन, नवी दिल्ली.
- Directorate of Economics and Statistics (2009-10): Maharashtra Economic View, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai.
- Dubey R. N. and Singh R. L. (1973): Economic and commercial Geography, Kitab Mahal Allahabad,